नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/02/2024 (शनिवार) सकाळ

## अवैधरीत्या देशी विदेशी दारु
## बाळगणाऱ्या आरोपींविरूद्ध
## नागपूर ग्रामीण विशेष पथकची कारवाई

आज दिनांक १६/०२/२०२४ रोजी मा. पोलीस अधीक्षक सा. यांचे विशेष पथक हे जिल्हा नागपुर ग्रामीण परीसरात अवैध धंदे रेडकामी खाजगी आणि सरकारी वाहनाने गस्त करीत असता पोलीस ठाणे मौदा हद्दीत गोपनीय सुत्रधाराकडुन माहीती मिळाली की, मौजा कडोली शिवारात भंडारा ते नागपुर मेन रोड लगत लाला की रसोई या ढाब्यावर, काउंटर मॅनेजर नामे यशवंत भटुजी गोंडाने नावाचा ईसम हा अवैधरित्या विनापरवाना देशी व विदेशी दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर खबरेप्रमाणे कडोली शिवारात भंडारा ते नागपुर मेन रोड लगत लाला की रसोई या ढाब्यावर रेड केली असता घटनास्थळी मिळुन आलेल्या ईसमास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी आपले नाव यशवंत भटुजी गोंडाने, वय ६५ वर्ष, रा. कामठी रोड पिवळी नदी शिल्पा कंपनी जवळ नागपुर असे सांगीतले. त्याची दारूबाबत झडती घेतली असता, त्याचे ताब्यातील लाला की रसोई या ढाब्यावर फ्रीजमध्ये आणि कोपऱ्यात ईतर ठिकाणी वेगवेगळया पिशवीत देशी व विदेशी दारू प्रत्येकी १८० आणि ९० एम.एल. आणि बिअरच्या ६५० एम.एल. क्षमतेच्या वेगवेगळया कंपनीचा सिलबंद बॉटल किमती १८,१९५/—रू. व नगदी १३,१५०/—रू. असा एकूण ३१,३४५/— रूपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आला. **आरोपी क्र. १) यशवंत भटुजी गोंडाने, वय ६५ वर्ष, रा. कामठी रोड पिवळी नदी शिल्पा कंपनी जवळ नागपुर २) संजय राधेश्यामजी जयस्वाल, वय ५५ वर्षे, रु. हनुमान मंदिर चौक भंडारा रोड, पारडी नागपूर ढाबा मालक** यांचेविरूद्ध पोस्टे मौदा येथे कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा, सहकलम १०९, ३४ भारतीय दंडविधान संहीता प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. अमित पांडे, पोलीस हवालदार ललीत उईके, पोलीस नायक प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले, शुभम मोरोकार विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.

# अवैधरीत्या देशी दारुची
# विक्री करणाऱ्या आरोपींविरूद्ध
# नागपूर ग्रामीण विशेष पथकची कारवाई

दिनांक १६/०२/२०२४ रोजी मा. पोलीस अधीक्षक सा. यांचे विशेष पथक हे जिल्हा नागपुर ग्रामीण परीसरात अवैध धंदे रेडकामी खाजगी आणि सरकारी वाहनाने गस्त करीत असता पोलीस ठाणे मौदा हद्दीत गोपनीय सुत्रधाराकडुन माहीती मिळाली की, मौजा कडोली शिवारात भंडारा ते नागपुर मेन हायवे रोड लगत लालाजी का धाब्यावर मॅनेजर प्रणय जयस्वाल नावाचा ईसम हा त्याचे मालक अजय जयस्वाल यांचे सांगणेप्रमाणे अवैधरित्या विनापरवाना देशी व विदेशी दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर खबरेप्रमाणे मौजा कडोली शिवारात भंडारा ते नागपुर मेन हायवे रोड लगत लालाजी का धाब्यावर रेड केली असता **आरोपी नामे— १) प्रणय प्रकाशनारायण जयस्वाल, वय ४१ वर्ष, रा. कडोली, तह. कामठी, जिल्हा नागपुर, लालाजी का धाबा मॅनेजर, २) अजय राधेश्याम जयस्वाल, वय ४५ वर्ष, रा. हनुमान चौक भंडारा रोड पारडी, नागपुर,** व्यवसाय—लालाजी का धाबा मालक त्यांची दारूबाबत झडती घेतली असता सदरचे हॉटेलमधील फ्रीजमध्ये आणि कोपऱ्यात ईतर ठिकाणी वेगवेगळ्या पिशवीत देशी व विदेशी प्रत्येकी १८०, ९० एम. एल आणि बिअरच्या ६५० एम. एलच्या क्षमतेच्या वेगवेगळ्या कंपनीचा सिलबंद बॉटल किंमती १८,१२५/—रू. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी यांचेविरूद्ध पोस्टे मौदा येथे कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा, सहकलम १०९, ३४ भारतीय दंडविधान संहीता प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. अमित पांडे, पोलीस हवालदार ललीत उईके, पोलीस नायक प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले, शुभम मोरोकार विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**